# राज्यघटनेचा परिचय

**घटना समिती व घटना निर्मिती—**

**भारतीय राज्यघटनेची वैशिष्टे**

.........................................................................................................................................

## घटना समिती व घटना निर्मिती—

१९४६ च्या कॅबिनेट मिशन योजनेत अशी तरतूद करण्यात आली होती की, भारतासाठी नवीन राज्यघटना निर्माण करण्यासाठी घटना समिती निर्माण करण्यात यावी. या घटना समितीतील सदस्यसंख्या ३८९ निश्‍चित करण्यात आली. (ब्रिटिश भारतातील २९२ प्रतिनिधी, देशी संस्थानांचे ९३ प्रतिनिधी आणि चीफ कमिशनरच्या प्रांतातील ४ प्रतिनिधी अशी ३८९ सदस्यांची घटनासमिती निश्‍चित करण्यात आली होती.) कॅबिनेट मिशन योजने नुसार जुलै, १९४६ मध्ये घटना समितीच्या सदस्यांची निवडणूक घेण्यात आली. घटना समितीमधील प्रतिनिधी प्रत्यक्ष जनतेने निवडून दिलेले प्रतिनिधी नव्हते. त्यांची निवड प्रांतांच्या विधिमंडळातील प्रतिनिधींमार्फत झालेली होती. घटना समितीत विविध पक्षांचे, हितसंबंधी गटांचे प्रतिनिधी होते. कॉंग्रेस पक्ष, मुस्लिम लीग, इंडियन ख्रिश्‍चन, वर्गीकृत जाती—संघटना, पारशी, उद्योग — व्यवसाय गट, अॅंग्लो—इंडियन, शीख, आदिवासी, संस्थानिक, स्त्रिया, कायदेपंडित इत्यादी गटांचे प्रतिनिधी घटना समितीत होते.

डॉ. राजेंद्र प्रसाद, पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ. बी. आर. आंबेडकर, सरदार वल्लभभाई पटेल, अब्दुल गफारखान, मौलाना अबुल कलाम आझाद, डॉ. खरे, डॉ. राधाकृष्णन, डॉ. सच्चिदानंद सिन्हा, बॅ. जयकर, डॉ. श्यामप्रसाद मुखर्जी, शंकरराव देव, इत्यादी नामवंत व प्रसिध्द व्यक्ती घटना समितीवर घेण्यात आलेल्या होत्या. समाजाच्या सर्व स्तरांतील अनुभवी, हुशार व्यक्तींचा घटना समितीत समावेश करण्यात आलेला होता.

घटना समितीची पहिली बैठक दिल्ली येथे ९ डिसेंबर, १९४६ रोजी घेण्यात आली. तात्पुरते अध्यक्षपद डॉ. सच्चिदानंद सिन्हा यांच्याकडे देण्यात आले होते. डॉ. रोजेंद्र प्रसाद यांची स्थायी अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. घटना निर्मितीचे कार्य २ वर्षे ११ महिने १८ दिवस चालले.

२९ ऑगष्ट, १९४७ रोजी मसुदा समितीच्या अध्यक्षपदी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची निवड करण्यात आली. के. एम. मुन्शी, एन. गोपालस्वामी अय्यंगार, अल्लादी कृष्णास्वामी अय्यर, सय्यद मोहम्मद सादुल्ला, बी. एल. मीटटर, डी. पी. खैतान, असे एकूण समितीचे ७ सदस्य होते.

२६ नोव्हेंबर, १९४९ रोजी घटनेच्या मसुद्याचे तिसरे वाचन होऊन डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या सहीने घटनेला मंजूरी देण्यात आली आणि राज्यघटना स्वीकारण्यात आली. घटनापरिषदेने मंजूर केलेल्या मूळ भारतीय घटनेत ३९५ कलमे व ९ परिशिष्टे होती. या नव्या राज्यघटनेची अंमलबजावणी २६ जानेवारी, १९५० पासून सुरू करण्यात आली.

**भारतीय राज्यघटनेची वैशिष्टे**

१. **लिखित व विस्तृत स्वरूपाची राज्यघटना:**

भारताची राज्यघटना निर्मित व लिखित स्वरूपाची राज्यघटना आहे. घटनापरिषदेकडून ही हेतुपुरस्सर निर्माण केलेली आहे. म्हणून तिला निर्मित राज्यघटना असे संबोधले जाते. भारतीय राज्यघटनेत ३९५ कलमे लिखित स्वरूपात आहेत. घटनेला १२ परिशिष्टे जोडण्यात आलेली आहेत. राज्यघटना २२ भागात विभागली गेली आहे. त्यामुळे भारताची राज्यघटना ही जगातील सर्व राज्यघटनांत सर्वात मोठी, विस्तृत राज्यघटना समजली जाते. घटना विस्तृत होण्याचे कारण असे की राज्यघटनेतील तत्वे अधिक तपशीलवारपणे स्पष्ट करण्यात आली आहेत.

२. **अंशत: परिदृढ व अंशत: परिवर्तनीय राज्यघटना:**

आपली राज्यघटना अमेरिकेच्या घटनेएवढी ताठर नाही. तसेच ती इंग्लंडच्या राज्यघटनेप्रमाणे अति लवचिकही नाही. भारतीय घटना काही अंशी लवचीक आहे. कारण परिस्थितीनुसार आणि गरजेनुसार भारतीय घटनेत अनेक दुरूस्त्या करण्यात आलेल्या आहेत. गेल्या ७० वर्षाच्या काळात भारतीय घटनेत १०४ घटनादुरूस्त्या करण्यात आलेल्या आहेत. घटनेत बदल करण्याची तीन पध्दती कलम ३६८ मध्ये देण्यात आलेली आहेत. संसदेच्या साध्या बहुमताने, संसदेच्या विशेष बहुमताने, आणि संसदेच्या विशेष बहुमत आणि निम्या घटक राज्याच्या संमतीने घटनेत बदल करता येतो. थोडक्यात, भारतीय राज्यघटना अंशत:परिवर्तनीय व अंशत: परिदृढ आहे असे म्हणता येईल.

३. **सार्वभौम, समाजवादी, धर्मातील, लोकशाही, गणराज्य:**

भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यात,'**सार्वभौम, लोकशाही, गणराज्य'** असा स्पष्ट उल्लेख केलेला आहे. १९७६ च्या ४२ व्या घटनादुरूस्तीने त्यात 'समाजवादी ' व 'धर्मातीत' या दोन शब्दांची भर घातली. त्यामुळे भारतीय घटनेने, **'सार्वभौम, समाजवादी, धर्मातीत, लोकशाही, गणराज्य'** प्रस्थपित करण्याची घोषणा केली आहे असे म्हणता येईल. भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेत समता, स्वातंत्र्य व बंधुता या लोकशाही तत्वांचा पुरस्कार केलेला आहे.

४. **संसदीय शासनपध्दती:**

भारतीय घटनेने संसदीय शासनपध्दतीचा पुरस्कार केलेला आहे. इंग्लंडच्या घटनेनुसार भारतीय राज्यघटनेत संसदीय शासनपध्दतीचा स्वीकार केलेला आहे. परंतु इंग्लंडच्या संसदीय पध्दतीचा पूर्णपणे तंतोतंत स्वीकार केलेला नाही. भारतात पंतप्रधान हा वास्तववादी सत्ता प्रमुख आहे आणि राष्ट्रपती नामधारी घटनात्मक प्रमुख आहे. पंतप्रधान व मंत्रिमंडळ संसदेला जबाबदार असतात. बहुमत प्राप्त पक्ष सत्ता स्थापन करतो आणि इतर पक्ष विरोधाची भूमिका बजावतात.

५. **संघराज्य शासनपध्दती:**

भारतीय राज्यघटनेत 'संघराज्य' शब्दाचा कोठेही उल्लेख आढळत नाही. संघराज्य (Federation) शब्दाऐवजी 'राज्यांचा संघ' (Union of States) असा उल्लेख केलेला आढळतो. भारतीय संघराज्यात कांही एकात्मक शासन पध्दतीची वैशिष्टे आढळून येतात. लिखित राज्यघटना, अधिकार क्षेत्राची विभागणी आणि सर्वोच्च न्यायालय ही संघराज्याची वैशिष्टे भारतीय संघराज्यात आढळतात. भारतात मध्यवर्ती सत्ता व घटक राज्ये यांच्यात अधिकार क्षेत्रांची विभागणी केलेली आहे. भारतीय राज्य वरकरणी संघराज्यात्मक वाटत असले तरी प्रत्यक्षात ते एकात्मक स्वरूपाचे आहे. कारण मध्यवर्ती सरकार अधिक शक्तिशाली झालेले आहे. अनेक बाबतीत केंद्र शासन राज्यावर नियंत्रण ठेवत असते.

६. **मुलभूत अधिकारांचा समावेश:**

घटनेच्या तिसऱ्या भागात भारतीय नागरिकांना मूलभूत अधिकार दिलेले आहेत.

१. समतेचा अधिकार

२. स्वातंत्र्याचा अधिकार

३. शोषणाविरूध्दचा अधिकार (पिळवणुकी विरूध्दचा हक्क)

४. धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार

५. सांस्कृतिक व शैक्षणिक स्वातंत्र्याचा अधिकार

६. मालमत्तेचा अधिकार (१९७८ च्या ४४ व्या घटनादुरूस्तीने हा अधिकार मूलभूत अधिकाराच्या यादीतून काढून टाकण्यात आला आहे.)

७. घटनात्मक उपाययोजनेचा अधिकार (सनदशीर इलाजाचा हक्क)

वरील सहा प्रकारचे मूलभूत अधिकार देऊन राज्यघटनेने नागरिकांचा सर्वागीण विकास साधण्याचा प्रयत्न केलेला आहे. स्वातत्र्य, समता, न्याय, बंधुता या तत्वांची जोपासना करून भारतीय लोकशाही यशस्वी करण्यासाठी घटनेत मूलभूत हक्कांचा समावेश करण्यात आलेला आहे.

**७ राज्याच्या धोरणा संबंधी नीतिनिर्देशक तत्वे (मार्गदर्शक तत्वे):**

भारतीय घटनेच्या चौथ्या भागात ३६ ते ५१ या कलमांव्दारे राज्याच्या धोरणासंबंधीच्या मार्गदर्शक तत्वांचा समावेश केलेला आहे. घटनाकारांनी भारतीय घटनेत आर्थिक, सामाजिक, राजकीय व आंतरराष्ट्रीय संबंध इत्यादी विषयक चार प्रकारच्या मार्गदर्शक तत्वांचा समावेश केलेला आहे. भारताचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी आणि कल्याणकारी राज्याच्या निर्मितीसाठी ही मार्गदर्शक तत्वे उपयुक्त आहेत.

**८.धर्मनिरपेक्ष राज्य (धर्मातीत राज्य):**

भारतीय घटनेच्या सरनाम्यात धर्मातीत (Secular) राज्याचा पुरस्कार केलेला आहे. भारतात हिंदू, मुसलमान, शीख, बौध्द, जैन, ज्यू, ख्रिश्चन, पारशी इत्यादी विविध धर्माचे लोक राहतात. भारतीय घटनेच्या २५ व २६ व्या कलमात असे स्पष्ट करण्यात आले आहे की शांतता व सुव्यवस्था टिकवून प्रत्येक नागरिकाला आपल्या धर्माचा प्रचार, प्रसार व पालन करता येईल. भारतीय नगरिकाला कोणत्याही धर्माचा स्वीकार व आचार करता येईल, परंतु इतर व्यक्तींच्या धर्माविरूध्द प्रचार करता येणार नाही. कायद्यासमोर सर्व धर्म समान मानण्यात आले आहेत.

१०. **स्वतंत्र न्यायदान पध्दती :**

भारतीय घटनेने न्यायालयाचे स्वातंत्र्य व श्रेष्ठत्व मान्य केलेले आहे. न्यायालयीन स्वातंत्र्य सुरक्षित ठेवण्यासाठी राज्यघटनेत खास तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. न्यायाधीशांच्या नेमणुका, त्यांच्या अधिकारांची शाश्वती, वेतन, भत्ते इत्यादी विषयक खास तरतुदी केलेल्या आहेत. भारतात न्यायदान पध्दती एकेरी स्वरूपाची आहे. न्यायमंडळाच्या सर्वोच्च पदी सुप्रीम कोर्ट, त्यांच्या खालोखाल हायकोर्ट (उच्च न्यायालय), उच्च न्यायालयाच्या नियंत्रणाखाली कनिष्ठ न्यायालये (दुय्यम) अशी न्यायदानाची एकरी पध्दती स्वीकारलेली आहे.

११. **प्रौढ मताधिकार:**

भारतीय घटनेने प्रत्येक भारतीय स्त्री—पुरूषाला मतदानाचा अधिकार दिलेला आहे. १८ वर्षे पूर्ण करण्यात आलेल्या प्रत्येक नागरीकास मतदानाचा अधिकार देण्यात आला आहे. जात, धर्म, लिंग, संपत्ती, अशा आधारावर कोणताही भेदभाव केला जाणार नाही.

१२. **अल्पसंख्यांक व मागासवर्गीय लोकांना सवलती:**

भारतात सामाजिक न्याय व समता प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने घटनाकारांनी अल्पसंख्यांक जातीजमातींसाठी आणि मागासलेल्या वर्गासाठी काही खास तरतुदी करून ठेवलेल्या आहेत.

१३. **एकेरी नागरिकत्व व एकच राज्यघटना:**

भारतीय राज्यघटनेने एकेरी नागरिकत्वाचा पुरस्कार केलेला आहे. घटनेच्या कलम ५ ते ११ मध्ये भारतीय नागरिकत्वाच्या तरतुदी दिलेल्या आहेत. घटक राज्याचे नागरिकत्व आणि संघराज्याचे नागरिकत्व अशी दुहेरी नागरिकत्वाची पध्दती भारतीय घटनेने स्वीकारलेली नाही. तसेच घटक राज्यांसाठी स्वतंत्र राज्यघटना नाही.

**१४. व्दिगृहात्मक कायदेमंडळ पध्दती:**

भारतीय राज्यघटनेच्या कलम ७९ मध्ये असे स्पष्ट लिहिले आहे की, 'संघराज्यासाठी एक संसद असेल आणि राष्ट्रपती, राज्यसभा व लोकसभा अशी दोन सभागृहे मिळून ती बनलेली असेल'. राज्यसभा हे वरिष्ठ सभागृह असून ते घटक राज्यांचे प्रतिनिधीत्व करेल. लोकसभा हे कनिष्ठ गृह असून या गृहातील सदस्यांची निवड जनतेकडून गुप्त व प्रत्यक्ष पध्दतीने होते. हे जनतेचे प्रतिनिधीत्व करेल.

**समारोप:**

अशा प्रकारे भारतीय राज्यघटना एक मूलभूत दस्तऐवज आहे. गेली सात दशके या घटनेनूसार या देशाचा कारभार चालू आहे. आजपर्यंत सुमारे १०६ वेळा घटनेत बदल करण्यात आले आहेत. तथापी राज्यघटनेचा मूळ ढांचा बदललेला नाही. राज्यघटनेतील उदात्त उद्देशांची यशस्वी अमलबजावणी आपल्या शासन यंत्रणेतील प्रामाणीक प्रयत्नांवर अवलंबून आहे.